| | |
|---|---|
| पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८. करआकारणी व करसंकलन विभाग | |
| परिपत्रकाचे स्वरुप | मालमत्ताकर आकारणी / हस्तांतरणबाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/९/कावि/४८६ /२०२२, दिनांक २३ / ०९ /२०२२ |
| विषय : | हिबा / हिबानामा प्रकरणी कार्यवाही करणेबाबत.. |
| कोणाच्या माहिती / कार्यवाहीसाठी | मालमत्ता कर आकारणी, तसेच वसूली करणारे सर्व अधिकारी / कर्मचारी |
| संदर्भ | १.कायदा विभागाकडील अभिप्राय... अ)क्रमांक कास /२/कावि/१०६०/२०१९, दिनांक ०३/०१/२०१९ ब)क्रमांक कास /२/कावि/०६/२०१९, दिनांक १८/०३/२०१९ क)क्रमांक कास /२/कावि/५४०/२०१९,दिनांक २३/०९/२०१९ २.परिपत्रक क्र.कर/मुख्य/९/कावि/३१८/२०१९,दिनांक २२/०७/२०१९ ३.क्रमांक कर/मुख्य/९/कावि/३२५/२०१९,दिनांक २६/०७/२०१९ |

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२७ व १२९ मधील तरतूदीनुसार मालमत्ता कराची आकारणी करणेत येते.त्याचप्रमाणे मालमत्ताकराचे बिलावरील नाव आवश्यक त्या नियमाधीन कागदपत्रांचे आधारे हस्तांतरणानुसार नावात बदल करणेची कार्यवाही करणेत येते.

मुस्लीम पर्सनल लॉं अंतर्गत ग्राह्य असलेले हिबा अनोंदणीकृत (मौखिक बक्षिसपत्र) / हिबानामा हे मालमत्तेवर नाव लावणे अथवा नाव बदलणे (मालमत्ता हस्तांतरण) करिता पुरावा म्हणून ग्राह्य धरणेबाबत नागरिकांकडून मागणी करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासन नगरपरिषद संचालनालय यांनी पत्र क्रमांक नपप्रस/२०१८/जाहिरात/सर्व न.प./प्र.क्र. १५५/पक्ष-१२(६)/२३१३,दिनांक ७ ऑगस्ट २०१९ चे पत्रान्वये सर्व नगरपरिषदा/नगर पंचायती यांना हिबा / हिबानामा प्रकरणी करावयाचे कार्यवाहीबाबत निर्देश दिलेले आहेत.तसेच सदर विषयाचे अनुषंगाने कार्यवाही करता येईल किंवा कसे याबाबत कायदा विभागाकडून संदर्भीय १ नुसार खालील अभिप्राय प्राप्त झाले आहेत.

> "मिळकतकर आकारणीकरिता हिबा अनोंदणीकृत (मौखिक बक्षिसपत्र) / हिबानामा हे दस्त ग्राह्य धरता येऊ शकतील कारण हिबाचे संदर्भात मुस्लीम कायद्यामध्ये ३ आवश्यक तरतुदी असतात.त्या म्हणजे 1) Declaration 2) Acceptance 3) The Delivery Of Possession.सदरच्या तीन बाबी अंतर्भूत असल्याशिवाय हिबा / हिबानामा हे दस्त कायदेशीर होत नाहीत.हिबा हा तोंडी असू शकतो व लेखी सुद्धा असू शकतो.लेखी हिबाला हिबानामा असे म्हणतात.हिबानामा हे दस्त रजिस्टर करण्याची गरज नाही,म्हणून हिबानामा हे स्वीकारून वरील तीन बाबींची खात्री करूनच त्याआधारे हिबानामाची अंमलबजावणी करता येते व कसे हे सिद्ध झाल्यावर हिबा / हिबानामा हे दस्त मे.सर्वोच्च न्यायालयाच्या तत्वानुसार ग्राह्य धरता येऊ शकतील. "

सबब, हिबा / हिबानामा संदर्भातील मालमत्ता हस्तांतरण प्रकरणी कायदा विभागाचे उपरोक्त अभिप्रायानुसार कार्यवाही करणेत यावी. हस्तांतर प्रकरणी कार्यवाही करताना उर्वरित कार्यपद्धती यापूर्वी निर्गत केलेल्या परिपत्रकानुसारच राहील.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रति – प्रशासन अधिकारी,सहा.मंडलाधिकारी,गटप्रमुख
सर्व करसंकलन विभागीय कार्यालय

प्रत - १.कायदा विभाग
२. माहिती व तंत्रज्ञान विभाग / TECH – 9